REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २ ऑक्टोबर, १९४० | अंक ४०

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ८ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें ता. २४ सप्टेंबर रोजीं हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ८ पै इतका पडला.

### भांडवल वाढविलें

टाटा ऑइल मिल्स कं. लि. नें आपलें भांडवल नवीन प्रत्येकी २५ रुपयांचें १,१२,००० भाग काढून वाढविलें आहे. पूर्वीचें भांडवल ४७ लक्ष रुपये होतें तें आतां ७५ लक्ष रुपये झालें आहे.

### पगारांत कपात

पंजाब सरकारनें आपल्या नोकरांचे पगारांत १० % कपात करण्याचें योजिलें आहे.

### लिमिटेड कंपनीनें आपली नांवाची पाटी कोठें लावावी ?

डॉ. एच. एल. बाटलीवाला व मि.कैकोबाद बाटलीवाला ह्यांस मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं कंपनी ॲक्टाच्या ७३ ( अ ) कलमाखालीं दंड केला होता. प्रत्येक लिमिटेड कंपनीनें आपल्या नांवाची पाटी आपल्या कचेरीच्या अगर कामाचे जागेच्या बाहेर, सहज दिसेल अशा रीतीनें लावली पाहिजे, असें हें कलम सांगतें. प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे निकालावर हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज करण्यांत आला. “ लिमिटेड कंपनीनें आपल्या नांवाची पाटी व्यवहाराचे जागेचे बाहेर लावली पाहिजे असें नाहीं; कचेरीचे बाहेर इमारतीचे आंतच ती सहज दिसेल अशी लावलेली असली तरी पुरें आहे ” असा हायकोर्टानें निवाडा दिला.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

ऑगस्ट, १९४० अखेर हिंदुस्थानांत एकूण १,१२,३०८ रेडिओ लायसेन्स चालू होते. म्हणजे, गेल्या १२ महिन्यांत सुमारें ३२३/४ हजार लायसेन्स वाढले.

### मुसलमान धर्माची रेडिओस अनुमति

मुसलमानांना जवळ रेडिओ सेट्स बाळगण्यास धर्माची अनुमति आहे किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचें उत्तर काबूल जमिअत–उलउलेमानें अस्तिपक्षी दिलें आहे, त्यामुळें सरहद्द प्रांतापलीकडील प्रदेशांत रेडिओ बाळगणाराविरुद्ध काहूर उठणार नाहीं, असा समज आहे.

### हिंदुस्थान सरकारच्या कर्जाची परतफेड

५% १९४०–४२ च्या कर्जरोख्यांच्या परतफेडीची तारीख १ ऑक्टोबर, १९४० ही आहे. त्यानंतर रोख्यांवर व्याज मिळणार नाहीं.

### कॅनडांतील लोकसंख्या

कॅनडाची लोकसंख्या १ कोटि, १२ लक्ष आहे. जननाचें दर हजारीं प्रमाण २०·५ आहे. विवाहांचें प्रमाण ८·१ पडतें. अनौरस संततीचें दरशेकडा प्रमाण वाढलें असून आतां तें ४·०१% आहे. कॅनडांतील वेड्यांच्या इस्पितळांत ४० हजार व्यक्तींची सोय आहे. ती माणसी १० हजारांनीं लवकरच वाढवावी लागेल.

### १० कोटि पौंड चहा

१९३९–४० मध्यें हिंदुस्थानांत उपयोगांत आणण्यासाठी १० कोटि पौंड चहा उपलब्ध आहे, असा इंडियन टी मार्केट एक्सपान्शन बोर्डाचा अंदाज आहे.

### कोचीन येथें विमानतळ

कोचीन येथें विमानतळ बांधण्यास लवकरच प्रारंभ होईल. ह्या एरोड्रोमला सुमारें ६ लक्ष रुपये खर्च येईल.

### मागचा इतिहास काय सांगतो ?

“ पोलादाच्या उत्पादनास हिंदुस्थानांत प्रारंभ करण्यांत आला, तेव्हां “ तज्ञां ” नीं त्याची हेटाळणी केली. हिंदुस्थानामध्यें आतां उत्कृष्ट दर्जाचें पोलाद तयार होत आहेना ? आज आपण साखर करीत आहों. सरकारनें संरक्षण दिलें, तरी साखरेचा धंदा फायदेशीर होणार नाहीं, असेंच आपणास दहा वर्षांपूर्वी सांगण्यांत आलें. पंधरा वर्षांतहि हिंदुस्थानांत पुरेशी साखर निघूं लागणार नाहीं, असें “ तज्ञ ” सांगत होते, परंतु पांच वर्षांतच अंतर्गत मागणीस पुरेशी साखर निघूं लागली. गेल्या वर्षी दहा लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें व ह्या वर्षी पंधरा लक्ष टनांचें उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे.” शेठ वालचंद हिराचंद ह्यांनीं विजगापट्टम येथील व्याख्यानांत, आपल्या नवीन योजनांची माहिती देतांना वरील हकीकत सांगितली.

### युद्ध कर्जरोख्यांच्या स्वरूपांत बक्षिसें

अहमदनगर येथें टेनिसचे सामने नुकतेच झाले, त्यावेळीं यशस्वी खेळाडूंस युद्ध कर्जरोख्यांच्या स्वरूपांत बक्षिसें देण्यांत आलीं.

### सर फ्रेड्रिक साइक्स ढाल

मध्यभागांतील ग्रामसुधारणेच्या सर्वांत यशस्वी प्रयत्नांबद्दल १९३९ ची सर फ्रेड्रिक साइक्स ढाल सोलापूर जिल्ह्यांतील शेळगांव ह्या गांवास देण्यांत आली आहे. शेळगांवची लोकसंख्या १,३३३ आहे.

### ॲक्च्युरिअल सोसायटी ऑफ इंडिया

विमागणिताची माहिती जनतेंत प्रसृत करणें, विम्याच्या प्रश्नांचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करणें, इत्यादि उद्देशानें वरील नांवाची संस्था मुंबई येथें स्थापन करण्यांत आली आहे, तिचे श्री. एल. एस. वैद्यनाथन हे अध्यक्ष आहेत.

### बँकांस सुटी

गुरुवार, ता. १० रोजीं दसऱ्यानिमित्त बँका बंद रहातील.

### भुइमुगाच्या लागवडींत वाढ

१९४०–४१ च्या मोसमांत सबंद हिंदुस्थानांत मिळून ७१ लक्ष, ८४ हजार एकरांत भुइमुगाची लागवड झालेली आहे. म्हणजे गेल्या वर्षीच्या मानानें लागवडीचें क्षेत्र १५% वाढलें आहे. एकट्या मद्रास प्रांतांतच एकूण लागवडीपैकी सुमारें निम्मी लागवड आहे. मुंबई प्रांतांचा वाटा २६% इतका आहे.

### उंसाची लागवड वाढली

| मोसम | एकर |
|---|---|
| १९३९-४० | ३७,०५,००० |
| १९४०-४१ | ४२,१५,००० |

म्हणजे, सबंद हिंदुस्थानांत मिळून एका वर्षांत उसाखालील क्षेत्र १४% नी वाढलें. एकूण उसापैकी ५२% उंस संयुक्त प्रांतांत १२% उंस पंजाबांत, ११% उंस बिहारमध्यें, ८% उंस बंगालमध्यें व ३% उंस मुंबई प्रांतांत आहे.

### जपानी आगपेट्यांची निर्गत

जपानमधून आगपेट्यांची निर्गत वाढत आहे. १९३० सालीं जपाननें २ लक्ष, ९२ हजार ग्रोस आगपेट्या परदेशीं पाठवल्या. १९३६ सालीं ४ लक्ष, ९ हजार ग्रोसची निर्गत झाली व १९३९ सालीं निर्गतीचा आकडा ६ लक्ष, १४ हजार ग्रोसवर गेला. जपानचें मुख्य गिऱ्हाइक चीन, हिन्दचीन, फिलिपाइन्स, हाँगकाँग, स्ट्रेट्स सेटलमेंट, ह्या देशांत आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४७० |
| २ हिंदी हुंडणावळ ... | ४७१ |
| ३ अमेरिका व ब्रि. साम्राज्य ह्यांचें फेडरेशन ... | ४७२ |
| ४ स्फुट विचार ... | ४७३ |
| इंग्लंडचें व्यापारी जहाजांचें सामर्थ्य—स्वदेशी धंद्यास सरकारचें सहाय—चित्रपट—तीन टक्क्यांचें भरपूर कर्ज—आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. | |
| ५ युद्धविषयक धोक्याचा विमा ... | ४७४ |
| ६ ज्वारीचें व गव्हाचें उत्तम बीं ... | ४७४ |
| ७ सहकारी चळवळीची प्रगति ... | ४७५ |
| ८ दर्यावरील मच्छीमारी | ४७७ |
| ९ विमा व्यवसायावर नियंत्रण ... | ४७७ |
| १० कपास कापडाच्या गिरण्या ... | ४७८ |
| ११ मुंबईतील होजिअरीचे कारखाने ... | ४७८ |
| १२ निवडक बाजारभाव | ४७९ |



# अर्थ

बुधवार, ता. २ ऑक्टोबर, १९४०


## हिंदी हुंडणावळ

### दर वाढविण्याची घातकी सूचना

हिंदी जनतेपुढें वारंवार ठेवल्या जाणाऱ्या विवाद्य विषयांपैकीं हुंडणावळीचा दर हा एक प्रमुख विषय आहे. चालू युद्ध सुरू होण्यापूर्वी वर्षदोन वर्षेपर्यंत आधूनमधून हुंडणावळीच्या दरांत फेरफार करण्याच्या सूचना अनेक तज्ञ व्यक्ती व व्यापारी संस्था ह्यांकडून केल्या जात होत्या. परंतु सरकारचा हुंडणावळ बदलण्याच्या धोरणास पूर्ण विरोध असल्यानें ह्या सूचनांचा अधिकाऱ्यांकडून विचारहि झाला नाहीं. आतां युद्ध सुरू झाल्यापासून पुन्हा गेल्या महायुद्धासारखी परिस्थिति निर्माण होऊं पहात आहे. तिचा फायदा घेऊन कांहीं हितसंबंधीं गटांनीं हुंडणावळीचे दर वाढविण्याच्या सूचना करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या प्रकाराचा एकनिष्ठपणा वेळींच स्पष्ट करून लोकमताचें सरकारवर दडपण उत्पन्न केल्यावांचून हिंदी शेतकरी व धंदेवाले ह्यांस निर्धास्त राहतां येणार नाहीं.

आजच्या परिस्थितींत हुंडणावळीच्या वाढीस कोणतीं कारणें अनुकूल आहेत ह्याचा विचार करण्यापूर्वी पुन्हां पुन्हां ह्या बाबतींत मतभेद कां माजतात व विशेषतः सरकारी धोरण आणि लोकपक्षीय मागणी ह्यांमध्यें महदंतर कां पडतें ह्याचें थोडक्यांत स्पष्टीकरण केलें पाहिजे. ज्या लोकांस हिंदुस्थानांतून परदेशीं, विशेषतः इंग्लंडला, पैसे पाठवावयाचे असतात त्यांस केव्हांहि हुंडणावळीच्या दरांत वाढ झाल्यानें निदान तात्काल तरी फायदा होतो. विलायतेंतल्या आपल्या खर्चास पैसे पाठवितांना हिंदुस्थान सरकारास नेहमीं वाढत्या दरामुळें बचत होण्यासारखी असते. म्हणजे विलायतेंत एक पौंड खर्च होण्यास येथें पहिल्याहून कमी रुपये खर्चीं पडतात. व्हाइसरॉयसाहेबांपासून तों एखाद्या नव्यानें लागलेल्या सनदी नोकरापर्यंत सर्वांचा पगार येथें रुपयानें दिला जाऊन शिलकी विलायतेंत जावयाच्या असल्यानें त्यांसहि वाढत्या दरानें त्यांच्या देशाचा पैसा म्हणजे पौंड अधिक मिळतात. खाजगी नोकरी व धंदे ह्यांमध्यें गुंतलेले परदेशी नोकर व भांडवलदार ह्यांसहि वाढत्या दराच्या पर्वणींत आपले हात धुऊन घेण्याची इच्छा असते. त्याचप्रमाणें परदेशांत माल खरेदी करून तो येथें विकणाऱ्या व्यापाऱ्यांस वाढत्या दरानें अधिक फायदा होण्याचा संभव असतो.

सरकारचें फडणिशी खातें, लहान-थोर सर्व परकी नोकर, खाजगी धंद्यांत असलेले परदेशी लोक आणि आयात मालाचा व्यापार करणाऱ्या मंडळ्या ह्या नेहमींच रुपयाचा दर वाढण्याची संधि पहात असतात. परदेशी हुंडणावळीचा धंदा करणाऱ्या पेढ्यांसहि अधून मधून आपल्या शिलका व नफा वाढाव्यानें विलायतेस नेतां आल्यास हवें असतें. उलट, वाढत्या दरानें येथील किंमतींचें मान उतरून जाऊन शेतकरी व धंदेवाले ह्यांचें नुकसान होतें. सरकार, सनदी नोकर व परदेशी व्यापारी आणि पेढीवाले ह्यांस होणाऱ्या फायद्याचा येथील धंदेवाले व शेतकरी ह्यांच्या अनेक पटींच्या मोठ्या तोट्यांतून वचपा निघतो. कांहीं परकीय हितसंबंधी गट संधि साधेल तेव्हां हुंडणावळीचा दर वाढविण्याची योजना पुढें कां करतात, त्या योजनेस सरकार व सनदी नोकर ह्यांची सर्वसाधारण अनुकूलता कां असते, आणि बहुतेक हिंदी धंदेवाले व पुढारी ह्यांचा त्या योजनेस विरोध कां असतो हें एवढ्यावरून स्पष्ट होईल.

हुंडणावळीच्या दराचा बरेवाईटपणा केवळ त्या दरानें समाजांतील निरनिराळ्या वर्गांवर तात्काल परिणाम कोणते होत आहेत एवढ्यावरच अवलंबून असतो असें म्हणण्याचा कोणाचाच हट्ट असणार नाहीं. आपल्या राष्ट्राचे इतर राष्ट्रांशीं व्यापार व इतर व्यवहार ह्यांमुळें जें देणें-घेणें उत्पन्न होतें त्यांतील रकमांच्या परस्पर प्रमाणांवरून हुंडणावळीच्या दराबद्दल निर्णय करावा लागतो. परराष्ट्रांस आपणांकडे पैसे पाठविण्याची आवश्यकता उत्पन्न होऊन त्यामानानें आपणांस परराष्ट्रांकडे पैसे पाठविण्याची कमी जरूर असली, तर परराष्ट्रीय पैशाचे मानानें आपल्या पैशाचा भाव सहजच वाढतो. कित्येक लोकांच्या मतें हिंदी रुपयाची आज अशीच स्थिति असल्यानें त्याचा भाव वाढविणें हें क्रमप्राप्त आहे. हा कोटिक्रम खरा असल्यास चढीच्या दरानें केवळ कांहीं वर्गांचा तोटा व कांहींचा नफा होण्यासारखा आहे म्हणून त्यास विरोध करणें शास्त्रशुद्ध होणार नाहीं.

चढीच्या दरास येथील तज्ञ व अनुभवी लोकमताचा विरोध आहे तो चढवाल्यांचे मुद्दे भ्रामक व अदूरदृष्टीचे आहेत म्हणून होय. १ सप्टेंबर १९३९ ते १ सप्टेंबर १९४० ह्या काळांत रिझर्व्ह बँकेजवळ असणाऱ्या पौंडांच्या हुंड्यांची एकंदर रक्कम पुष्कळच वाढली आहे हें खरें. गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेच्या नोटखात्यांत ५९½ कोटि किंमतीचे ब्रिटिश कर्जरोखे होते, तेच ह्या वर्षी १३१½ कोटी किंमतीचे, म्हणजे ७२ कोटींनीं अधिक आहेत. रिझर्व्ह बँकेच्या पेढीखात्यांत गेल्या वर्षांत ही रक्कम १० कोटींवरून ३० कोटींवर गेली. म्हणजे २० कोटी किंमतीचे अधीक ब्रिटिश कर्जरोखे शिलकी राहिले. ह्या काळांत हिंदुस्थान सरकारचा इंग्लंडमधील खर्च नेहमींसारखाच चालू होता. शिवाय, ३२ कोटि रुपयांची ब्रिटिश कर्जदारांची परतफेडहि ह्याच काळांत झालेली आहे. म्हणजे, एक वर्षांत सवाशे कोटींच्या वाढाव्यानें हिंदी चलनास असलेली मागणी वाढली तर सकृद्दर्शनीं रुपयाचा भाव वाढविणें योग्य आहे असा आभास उत्पन्न होऊं शकतो. ह्याच परिस्थितीचा फायदा घेऊन हुंडणावळीचा दर वाढविण्यासंबंधीं वर निर्दिष्ट केलेल्या कांहीं गटांकडून चळवळ सुरू झाली आहे.

सध्या ब्रिटिश सरकार युद्धकार्याकरितां मोठ्या प्रमाणावर येथें मालाची खरेदी करीत आहे व जसजसें युद्ध लांबेल तसतसें खरेदीचें प्रमाण वाढत जाणार हें निश्चित आहे. वाढत्या हुंडणावळीच्या दरानें ब्रिटिश सरकारला आपल्या रुपयांतील खरेदीस अधीक पौंड देण्याचा प्रसंग येणार; ह्याकरितां तात्काल चढीची भाषा बहुतेक सरकारास रुचेल असें वाटत नाहीं. परंतु गेल्या युद्धाच्या समाप्तीनंतर ज्या प्रमाणें दोन शिलिंग हुंडणावळ लादण्याचा प्रयत्न झाला, त्याप्रमाणें ह्या युद्धाच्या शेवटीं पुन्हां दर वाढविण्याची खटपट होईल अशी भीति वाटण्यास जागा आहे. ती चूक पुन्हां होऊं नये म्हणून रिझर्व्ह बँकेच्या ग्रेट ब्रिटनमधील वाढत्या शिलकांचें खरें स्वरूप काय आहे व त्यांचा विनियोग योग्य तऱ्हेनें कसा व्हावा हें स्पष्ट करणें जरूर आहे.

आज जवळ जवळ सवाशे कोटींचे अधीक ब्रिटिश कर्जरोखे रिझर्व्ह बँकेजवळ आहेत असें धरून चाललें तर प्रथमच प्रश्न असा निघतो कीं, एवढ्या मोठ्या प्रमाणांत परकी चलनांत शिलका गुंतविणें योग्य किंवा आवश्यक आहे किंवा काय? हिंदुस्थानाचें चलनविषयक धोरण स्वतंत्रपणें आंखण्यास रिझर्व्ह बँकेजवळील सोनें सध्यांहून पुष्कळच अधिक असावयास पाहिजे. पौंडांत गुंतविलेल्या शिलकांऐवजीं बँकेनें सोनें घेऊन ठेवलें असतें तर फुगलेल्या ब्रिटिश कर्जरोख्यांचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. परंतु सोनें पाठविण्यास येथील सरकार नेहमींच अनुकूल असतें; आपल्या इंग्लंडवरील मागण्यांस सोनें मिळावें ह्याबद्दल मात्र तें कधींच हट्ट धरीत नाहीं. अमेरिका व इंग्लंड ह्यांचा अत्यंत निकट संबंध आहे व अमेरिकन मालाची मोठ्या प्रमाणावर इंग्लंडकडून खरेदीहि होत आहे. परंतु विक्रीची किंमत सोन्यानें दिली जावी असें अमेरिकन धोरण असल्यानें इंग्लंडला हळुहळु सोन्याची निर्गत करावी लागत आहे. सोन्याच्या निर्यातीबद्दल उदार धोरण स्वीकारणाऱ्या हिंदुस्थान सरकारास आयातीबद्दलही निर्भीड राहण्यास हरकत नाहीं. वाढत्या पौंडांच्या रोख्यांऐवजीं सोनें सांठविणें हेंच धोरण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अधीक योग्य होय.

युद्धकाळीं ब्रिटिश सरकारास सोन्याची टंचाई पडूं नये ह्या उद्देशानें अगर सामान्यतः हिंदी चलन ब्रिटिश चलनाच्या आधारें राहणार असल्यानें सोनें सांठविणें आवश्यक नाहीं ह्या धोरणानें रिझर्व्ह बँकेस सोन्याचें इतकें महत्त्व वाटत नाहीं असें धरलें तरी ब्रिटिश कर्जरोखे एवढ्या प्रमाणांत संग्रहीं ठेवणें हें समर्थनीय ठरत नाहीं. अनेक ब्रिटिश लोकांनीं पौंडांच्या स्वरूपानें हिंदुस्थान सरकारास कर्ज दिलेलें आहे व ह्या कर्जाची एकंदर रक्कम तीन-चारशें कोटींच्यावर आहे. बँक ऑफ इंग्लंड व इंग्रज सरकार, व रिझर्व बँक आणि हिंदुस्थान सरकार ह्यांच्या सहकार्यानें विलायती कर्जरोख्यांचें हिंदी कर्जरोख्यांत रूपांतर करणें कठीण नाहीं. असेच व्यवहार अमेरिकेमध्यें गेल्या युद्धाचे वेळीं झाले व आजहि होत आहेत. हिंदुस्थान सरकारच्या विलायती कर्जांत उतार होणें हें त्या सरकारच्या व येथील लोकांच्याहि हिताचें आहे. कर्जाचें पौंडांतून रुपयांत परिवर्तन करण्याचा उपक्रम सरकारनें सध्यांहून अधिक चिकाटीनें केला पाहिजे हीच गोष्ट रिझर्व्ह बँकेजवळील पौंडांच्या वाढत्या कर्जरोख्यांनीं सिद्ध होत आहे.

पौंडांच्या वाढत्या शिलका ह्या खरोखर हिंदी मालास परदेशची मागणी वाढल्यानें उत्पन्न झालेल्या नाहींत ही गोष्ट हुंडणावळीच्या दराचा बरवर विचार करणारे लोक विसरतात. १९३९–४० सालच्या पहिल्या दहा महिन्यांपुरते परराष्ट्रीय व्यापाराचे आंकडे उपलब्ध आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, तेवढ्या मुदतींत निर्यात माल आयात मालाहून सुमारें ३७ कोटींहून अधिक होता व सोनेचांदीची निर्यात आयातीहून २७½ कोटींनीं अधिक होती. त्याच काळांत रिझर्व्ह बँकेनें ७३ कोटींच्यावर पौंडांच्या हुंड्या विकत घेतल्या. म्हणजे निव्वळ माल व सोनेचांदीचा व्यवहार हिशेबीं धरला तरीही निर्यातीच्या वाढाव्याहून बँकेस अधिक हुंड्या विकत मिळूं शकल्या. ह्यांतच व्यापाराखेरीज इतर मार्गानें होणाऱ्या आयातीची भर घातली तर बँकेस इतक्या किंमतीच्या पौंडांच्या हुंड्या कशा मिळाल्या हें कळणें अधिक दुर्घट होतें.

वरवर बिकट दिसणाऱ्या ह्या कोड्याचें उत्तर ब्रह्मदेश व रिझर्व्ह बँक ह्यांच्या संबंधांत सांपडतें. रिझर्व्ह बँक ही हिंदुस्थानाप्रमाणेंच ब्रह्मदेशाचीहि मुख्य पेढी आहे. त्या देशाची निर्यात आयातीहून जेवढी अधिक असेल त्या प्रमाणांत बँकेस पौंडांच्या हुंड्या मिळूं शकतात. वरील काळांत ब्रह्मदेशाचा हा वाढावा सुमारें २५ कोटींचा होता. तसेंच ८-९ कोटींचें सोनें बँकेनें परदेशी गिऱ्हाइकांकरितां येथें घेऊन ठेवलें होतें, त्याची किंमतहि पौंडांच्या हुंड्यानेंच बँकेस मिळाली. येथील आर्थिक प्रगतीस आळा घालणारे व विशेषतः शेतकरीवर्गाचें अपरिमित नुकसान करणारें हुंडणावळीच्या वाढीचें धोरण पुन्हां डोकें वर काढणार नाहीं एवढी आपण काळजी घेतली पाहिजे.

## अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य ह्यांचें फेडरेशन

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य ह्यांचें फेडरेशन करण्याची कल्पना अनेकांच्या मनांत असून ती लवकरच मूर्त स्वरूपांत येईल, असा विश्वास प्रकट केला जात आहे. असें फेडरेशन झाल्यास त्यांत एक भाषा बोलणाऱ्या, जगांतील एक तृतीयांश लोकसंख्येचा समावेश होऊन सुमारें ५० अब्ज रुपयांचा परराष्ट्रीय व्यापार त्या फेडरेशनच्या ताब्यांत येईल. अमेरिकेच्या घटनेचे पद्धतीप्रमाणेंच फेडरेशनची घटना राहील. ब्रिटिश साम्राज्यांतील स्वायत्त राष्ट्रांचाच, म्हणजे ग्रेट ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका व आयरा, ह्यांचाच फेडरेशनमध्यें समावेश व्हावा, असें अमेरिकेंतील लोक म्हणाले, तरी हिंदुस्थानासहि त्यांत स्थान मिळावें, असें एका ब्रिटिश साप्ताहिकांतील एक लेखक म्हणतो. नियोजित फेडरेशनमध्यें १½ कोटि चौरस मैल जमीन येऊन कोळसा, लोखंड, पोलाद, टिंबर, गहूं, इत्यादींच्या उत्पादनाचा मोठा भाग फेडरेशनमध्येंच तयार होईल. टिन, निकेल व रबर अमेरिकेंत होत नाहीं तें ब्रिटिश साम्राज्य त्यास देईल व अल्युमिनियमचें उत्पादन अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर होतें, तें ब्रिटिश साम्राज्यास मिळेल. फेडरेशनचें आर्थिक बळ प्रचंड होईल. २० कोटि श्वेतवर्णीय, ३६ कोटि हिंदी, ५ कोटि निग्रो, ६० लक्ष अरब, १० लक्ष चिनी व १ लक्ष रेड इंडियन लोकांचें हें फेडरेशन होईल. असें फेडरेशन अस्तित्वांत येणें ही जगाच्या इतिहासांतील चिरस्मरणीय गोष्ट ठरेल.

## वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टांत दुरुस्ती

युद्धविषयक घडामोडींमुळें कामगारांस इजा झाली, तर त्याची नुकसानभरपाई करण्याची वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टाखालील मालकांवरील जबाबदारी दूर करण्याकरितां तातडीनें एक कायदा करण्याचें हिंदुस्थान सरकारनें योजिलें आहे. युद्धामुळें कामगारांस इजा होण्याचा संभव फार दूरचा असल्यामुळें अशी व्यवस्था करण्याची आवश्यकता सरकारास आजवर भासली नाहीं, परंतु एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडियानें ह्याबाबत सरकारास निकडीची विनंती केली व युद्धाचें क्षेत्र पसरत चाललें असल्यामुळें सदरहू कायद्याची योजना आतां केली जात आहे.

# स्फुट विचार

### इंग्लंडचें व्यापारी जहाजांचें सामर्थ्य

इंग्लंडच्या व्यापाराची नाकेबंदी करून ह्या राष्ट्रास जेरीस आणण्याचे हिटलरचे प्रयत्न कसून चालले आहेत. पाणबुड्या बोटी व विमानें ह्यांचे वहातुकीच्या जहाजांवर हल्ले चढवून ती बुडवण्याच्या आपल्या मोहीमेस यश येत असल्याचें तो भासवीत आहे व ह्या बाबतींत खोटा प्रचार करून जगाची दिशाभूल करीत आहे. शत्रूनें बुडवलेल्या व्यापारी जहाजांचे आंकडे दर आठवड्यास प्रसिद्ध करून इंग्लंड वस्तुस्थिति पुढें मांडीत आहे; ती लक्षांत घेणें आवश्यक आहे. आपल्या जहाजांचा होणारा नाश इंग्लंडनें झाकून ठेवलेला नाहीं. जहाज खात्याचे मंत्रि, मि. डोनॉल्ड क्रॉस ह्यांनीं नुकतीच जी तपशीलवार माहिती सांगितली तीवरून युद्ध चालू होण्यापूर्वी इंग्लंडच्या हुकमतीखालीं जेवढीं व्यापारी जहाजें होतीं त्यापेक्षा अधिक जहाजें सध्या ह्या राष्ट्रापाशीं आहेत ह्या विषयीं समाधानकारक पुरावा मिळतो. व्यापारी वहातुक करणाऱ्या जहाजांचे विषयीं दोन पक्षांची परिस्थिति काय आहे तें पहा. जर्मनीच्या ताब्यांत युद्धाच्या प्रारंभापूर्वी जहाजें होतीं, त्याच्या दोन तृतीयांशच आज शत्रूच्या हातांत आहेत; आणि त्यांचे व्यवहार बाल्टिक समुद्र व फ्रान्सचा किनारा ह्यांचे बाजूसच चालू आहेत. इटलीची अवस्थाहि हीच आहे. पूर्वीच्या तीन-चतुर्थांशाइतकीच व्यापारी जहाजें इटलीजवळ आज आहेत. ह्याच्या उलट, शत्रूनें केलेला ब्रिटिश जहाजांचा सर्व नाश भरून निघाला असून तीं महासागरांत निर्भयतेनें ये-जा करीत आहेत. युद्धापूर्वीच्या ब्रिटिश जहाजांपैकीं आठ टक्के शत्रूनें बुडवलीं असलीं तरी त्यांची जागा शत्रूचीं पकडलेलीं, नवीन बांधलेलीं व इतर जहाजें ह्यांनीं भरून निघाली आहे. ब्रिटिश जहाजांस केवळ एकच अडचण सोसावी लागत आहे आणि ती म्हटली म्हणजे भूमध्य समुद्र टाळून त्यांस दूरच्या मार्गानें प्रवास करावा लागत आहे, ही होय. त्याचप्रमाणें, कांहीं व्यापारी जहाजें आरमारी कामाकडे योजलीं जात आहेत आणि कित्येकांचा उपयोग युद्धोपयोगी कारखान्यांसाठीं कच्चा माल आणण्याकडे होत आहे. तरीहि इंग्लंडमधील जनतेच्या योगक्षेमासाठीं मालाची ने-आण करण्यास लागणारें सामर्थ्य ब्रिटिश व्यापारी जहाजांत आहे.

### स्वदेशी धंद्यास सरकारचें सहाय-चित्रपट

सध्याच्या युद्धपरिस्थितींत हिंदी उद्योगधंद्यांस दोन तीन प्रकारांच्या सहायाची आवश्यकता आहे. युद्धास अत्यंत उपयोगी असलेल्या साधनांचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांस कच्चा माल व यंत्रसामुग्री मिळाल्यावांचून त्यांचेकडून पुरेशी कामगिरी होणार नाहीं, ह्यासाठीं सदरहु बाबतींत त्यांस जरूर त्या सवलती व सोयी मिळाल्या पाहिजेत. ह्यांतहि महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे युद्धसामुग्री तयार करणारा एखादा नवीन कारखाना किंवा धंदा निघत असल्यास युद्धसामुग्रीनंतर त्याचें नुकसान होणार नाहीं आणि त्यास जरूर तें संरक्षण मिळेल अशी व्यवस्था प्रथमपासूनच होणें अगत्याचें आहे. ह्या संबंधांत हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांनीं आश्वासन दिलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. नवीन व युद्धोपयोगी धंद्यांत भांडवल गुंतवणारास उत्तेजन मिळणें ही येथें महत्वाची बाब आहे. आपण आपला पैसा ज्या मालाच्या उत्पादनांत अडकवीत आहों, त्या मालास युद्धोत्तर मागणी नसल्यानें तें भांडवल बुडणार नाहीं असें दिसल्यास लोक कारखाने काढण्यास कचरणार नाहींत. ही व्यवस्था सरकार आणि जनता ह्या दोघांच्या दृष्टीनें अगत्याची आहे. दुसरे असे कित्येक स्वदेशी धंदे आहेत कीं त्यांची युद्धास प्रत्यक्ष मदत होत नसेल पण जनतेच्या योगक्षेमासाठीं त्यांस महत्त्व आहे. युद्ध-परिस्थितींत असल्या धंद्यांच्या मार्गांत अडचणी येत असतील तर त्या दूर होण्यासहि सरकारचें सहाय हवें आहे. हिंदी चित्रपटांचा धंदा ह्या वर्गांत येतो. कच्ची फिल्म व कित्येक रासायनिक द्रव्यें हीं त्या धंद्यास अव्याहत मिळणें आवश्यक आहे. त्यांच्या पुरवठ्याची शाश्वती चित्रपटाच्या धंद्यास वाटली पाहिजे. ह्या संबंधांत सर ए. रामस्वामी ह्यांच्या मद्रासमधील मुक्कामांत चित्रपटाच्या धंद्याच्या प्रतिनिधींनीं आपली मागणी पुढें मांडली. फिल्म व रासायनिक द्रव्यें ह्यांचें उत्पादन ह्या देशांत होऊं लागण्यास शास्त्रीय प्रयोग करावे लागतील आणि त्यांत सरकार धंद्यास सहाय देईल असें आश्वासन व्यापारमंत्र्यांनीं दिलें. पण ही पुढची गोष्ट आहे. चित्रपटास लागणाऱ्या साधनांचा पुरवठा होण्यास आज अडचणी भासत आहेत, त्यांचें निवारण होण्याचें विशेष अगत्य व महत्त्व आहे. चित्रपटाच्या धंद्याचा व्याप आणि त्याची राष्ट्रीय उपयुक्तता लक्षांत घेऊन सरकारनें त्यास सवलती व सहाय देणें आवश्यक आहे. सर ए. रामस्वामी ह्या बाबतींत योग्य ते उपाय योजतील अशी आशा आहे.

### दि आयुर्वेद रसशाळा पुणें लि., पुणें

३१ मे १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षांत वरील कंपनीचें १,६४,२०० रुपयांचें भाग भांडवल खपलें असून १,२५,२५५ रुपयांचें भाग भांडवल वसूल झालें आहे. अहवालाचे वर्षींच कंपनीनें अधिकृत भांडवल ५,००,००० रुपयांचें केलें. कंपनीच्या औषधांची विक्री ५०% हून अधिक वाढली हें कंपनीच्या प्रगतीचें द्योतक आहे. कंपनीच्या कारखान्याचा व्याप वाढत असून स्वतःच्या इमारतीची आवश्यकता तीव्रतेनें भासत आहे. कंपनीच्या मालकीची ३५,०१८ रुपयांची जमीन आहे; इमारतीची किंमत १,६०३ रुपये आहे, मशिनरी ७,०६७ रुपयांची आणि फर्निचर वगैरे १२,३८० रुपयांचें आहे. अहवालाचें वर्षीं कंपनीस १३,०६५ रुपयांचा निवळ नफा झाला; गतवर्षीं निवळ नफ्याचा आकडा ३,४९२ रुपये होता. ऑर्डिनरी शेअर्सवर शेकडा ९ प्रमाणें डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें. त्याकरितां ८,४०९ रुपये लागतील; पैकीं निम्मी रक्कम कंपनीच्या घटना कलमानुसार राष्ट्रीय शिक्षण मंडळास देण्यांत येऊन बाकीची रक्कम भागीदारास वाटण्यांत येईल. कंपनीची वार्षिक सभा २९-९-४० रोजीं झाली.

### तीन टक्क्यानें भरपूर कर्जे

अनेक कारणांनीं चालू युद्धांत व्याजाचे दर कमी राहणार ही गोष्ट दिवसें दिवस प्रत्ययास येत आहे. पंजाब, संयुक्त प्रांत, मद्रास व आसाम ह्या चार प्रांतांच्या सरकारांनीं गेल्या आठवड्यांत आपापल्या प्रांतांकरितां अनुक्रमें १७५, १००, ७० व ५० लक्ष रुपयांचीं कर्जें काढिलीं. हीं सर्व कर्जें किफायतशीर कामीं खर्च

करण्याकरितां उभारलेली असून रिझर्व्ह बँकेमार्फतच त्याची व्यवस्था होत आहे. सर्व प्रांतिक सरकारें दरसाल दीड टक्क्या-प्रमाणें स्वतंत्र गंगाजळी ठेवून तिच्यांतून प्रतिवर्षी आपापले कर्ज-रोखे विकत घेणार आहेत. चारही कर्जें १९५२ मध्यें परत मिळणार आहेत. ह्या सर्व बाबतींत चारही कर्जांत साम्य असून त्यांच्या विक्रीच्या किंमतींत मात्र थोडा फरक आहे. मद्रासचे रोखे शेंकडा ९५ नें विकणेचे असून पंजाब व संयुक्तप्रांत ह्यांचे ९४ रु. ८ आ. व आसामचे तर ९४ रु. नें विकावयाचे होते. कर्जास मागणी-पत्रें देण्याची वेळ सुरू होतांच थोड्या अवधींतच जरूरीपेक्षा अधिक रकमेचे अर्ज दाखल झाले अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. वरील बाबतींत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. तीन टक्क्यानें काढलेलें कर्ज आज १०० स १०० रुपयांच्या भावानें विक्रीस काढलें तरी पुरेपूर खपेल; अशी पुष्कळ तज्ञांची खात्री आहे. असें असून ह्या प्रांतिक कर्जांची किंमत कमी ठेवण्यांत आली व त्यांतही प्रांताप्रांतांत भेद करण्यांत आला ह्या गोष्टी ध्यानांत येण्यासारख्या आहेत. ज्या चार प्रांतांच्या सरकारांनीं कर्जें काढिलीं आहेत त्यांच्या सांपत्तिक स्थितींत अगर पेढींवरील पतींत फरक आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रांताप्रांतांत विक्रीच्या किंमतींत जो दर शेंकडा रुपया आठ आण्यांचा फरक आहे तो मुख्यत्त्वेंकरून एका प्रांतांतील पैसे गुंतविणारास इतर प्रांतिक कर्जांत पैसे गुंतविण्यास सोय-गैरसोय किती वाटते ह्यावर अवलंबून आहे. ही गैरसोय कित्येक वेळां रिझर्व्ह बँकेची कचेरी जवळ नसण्यानें उत्पन्न होते, तर कधीं कधीं ती निव्वळ काल्पनिकहि असते. सरकारी कर्जरोख्यांच्या बाजारांत पैसे गुंतविणारास अधिकांत अधिक उत्तेजन द्यावयाचें असेल तर प्रांताप्रांतांमधील कर्जांच्या भावाचे हे भेद कमी करण्याकडे रिझर्व्ह बँकेचा अधिक कल असावयास पाहिजे.

---

### व्याजाचा दर आणखी खालीं आऊं शकेल काय?

चारी प्रांतांमध्यें मद्रास इलाख्यास अधिकांत अधिक अनुकूल भाव मिळाला आहे. ह्या इलाख्याची आर्थिक परिस्थिति हिंदुस्थान सरकारच्या स्थितीहून कमी समाधानकारक नाहीं. सोयीच्या दृष्टीनेंही मद्रास सरकारचे रोखे हिंदुस्थान सरकारच्या रोख्याच्या बरोबरचे आहेत. असें असून त्याही सरकारास आज १०० स ९५ भावानें रोखे विकावे लागत आहेत ह्यावरून रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचा व रोख्यांच्या बाजारांतील आगामी घडामोडींचा थोडा उलगडा होण्यासारखा आहे. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतिक सरकारांची पत सारखीच समजली पाहिजे असें असतां ज्या अर्थी प्रांतिक कर्जरोख्यांचे सुरुवातीचे भाव बाजारांतील परिस्थितीच्या मानानें अधिक प्रतिकूल ठेवले जातात त्या अर्थी हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांची पहिल्या प्रतीची प्रतिष्ठा निर्विवाद असावी ह्यांबद्दल विशेष खटपट केली जाते असें दिसतें. हिंदुस्थान सरकारच्या सध्या खुल्या असणाऱ्या रोख्यांनीं तात्पुरत्या गरजा भागविण्यास त्यास जरूर होतें त्याहून अधिक कर्ज मिळालें आहे. तरी ह्यापुढें युद्धोपयोगी धंदे व सरकार ह्या दोहोंचीही भांडवलास मागणी वाढली तरी ती तीन टक्क्यांनीं भागावी असाही प्रांतिक कर्जांची किंमत थोडीशी कमी करून दाखविण्यांत हेतु असावा. चलन व पेढ्यांचे व्यवहार ह्यांवरील सरकारी नियंत्रणाचा उपयोग व्याजाचे दर कमी पातळीवर ठेवण्याकडे केला जात आहे. त्यांत आक्षेपार्ह असें कांहींच नाहीं. उलट येथील पेढ्यांत अधिक एकसूत्रीपणा आणून व चलनविषयक धोरण अधिक प्रभावी करून सरकार व धंदेवाले ह्यांच्या भांडवलविषयक गरजा दीर्घकालपर्यंत सध्यांहूनही कमी दरांत भागविणें शक्य आहे. युद्धाची हालहवाल, राजकीय आंदोलनें व पैशाचा मोसम ह्यापैकीं कोणत्याही कारणानें आतां रोखे बाजारावर म्हणण्यासारखा परिणाम होत नाहीं, त्याचें मुख्य कारण हें कीं, पैसे गुंतविणारास ह्या गोष्टींपासून अलिप्त असे दुसरे कोणतेही मार्ग आज उपलब्ध नाहींत. उलट, भांडवलाचा पुरवठा मात्र खेळत्या ठेवींच्या अगर सक्तीनें गुंतवाव्या लागणाऱ्या रकमांच्या रूपानें एकसारखा वाढत राहतो. धंदे वाढले तरी जोंपर्यंत चलन व पेढ्या ह्यांचें योग्य नियमन होत आहे तोंपर्यंत व्याजाचा दर अगर विक्रीची किंमत ह्यांत सध्यांहून अधिक सवलत द्यावी लागणार नाहीं. उलट व्याजाचा दर आणखी उतरणें अशक्य नाहीं.

---

## युद्धविषयक धोक्याचा विमा

### अंमलबजावणीस प्रारंभ

युद्धविषयक धोक्याच्या, विम्याचे योजनेची अंमलबजावणी ता. १ ऑक्टोबर रोजीं सुरू झाली. सक्तीची अंमलबजावणी १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. मध्यवर्ती सरकारनें ह्या योजनेकरितां १०७ विमा कंपन्यांस आपले एजंट नेमलें आहे, परंतु त्यांस आपला हा संबंध प्रसिद्ध करण्यास मनाई आहे. त्यांस त्यांच्या खर्चाची निवळ रकम सरकार देईल. ज्यांनीं एकाद्या कंपनीकडे आगीचा, अपघाताचा, वगैरे विमा उतरला असला, तर तिचेकडेच त्यांनीं युद्धविषयक धोक्याचा विमा उतरणें सोईचें आहे. ह्या विम्याची पॉलिसी वेचन करतां येणार नाहीं. मालाच्या खऱ्या किंमतीपेक्षा कमी किंमतीचा विमा जाणूनबुजून उतरला, तर विमापॉलिसी रद्द समजली जाईल. कारखान्यांच्या इमारती, यंत्रसामुग्री, इत्यादींच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याचे योजनेंत समावेश केलेला नाहीं.

---

### ज्वारीचें व गव्हाचें उत्तम बीं

हवेली तालुका ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन (हवेली मामलेदार कचेरी) पुणें या संस्थेंत गहूं बनगी पट्टी ८०८ व मोहळफार्म ज्वारी नं. २५११ व ४७३२ चें उत्तम बीं आणविण्यांत आलें असून बिलकूल फायद्याची अपेक्षा न करितां शेतकरी सभासदांस तें विकायाचें योजलें आहे. ज्वारीचे पिकास कांहीं रोग होऊं नये म्हणून गंधक लावणें अत्यंत अवश्यक असतें, परंतु कांहीं शेतकऱ्यांकडून ही काळजी घेतली जात नाहीं असें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून चालू सालीं संस्थेतर्फे प्रसार करण्यांत येणाऱ्या ज्वारीचे दाण्यास गंधक लावूनच देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. हवेली तालुक्यांतील ज्या शेतकरी सभासदांस बीं पाहिजे असेल त्यांनीं तें संस्थेमधून लवकर नेण्याची व्यवस्था करावी. शिवाय तालुक्यांतील शेतकऱ्यांजवळ जर इतर कोणतेंहि उत्तम बीं-बियाणा असेल तर त्याची खबर संस्थेस जरूर द्यावी; म्हणजे त्यांना बीं विक्रीबाबत संस्थेस शक्य ती मदत करितां येईल.

---

### सहकारी गणेशोत्सव, बारामती

१९३९ सालापासून बारामती येथे सहकारी गणेशोत्सव साजरा करण्यांत येत आहे. चालू वर्षी हा उत्सव मोठ्या प्रमाणावर पार पडला. उत्सवांत कीर्तनें, व्याख्यानें, प्रवचनें, मारून इत्यादि कार्यक्रम करण्यांत आले. मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब जाधव व सेक्रेटरी श्री. म. गो. दळवी हे होते.

## १९३८-३९ मधील सहकारी चळवळीची प्रगति

### मुंबई प्रांतिक सहकारी खात्याचा अहवाल

शेतीचा प्रतिकूल हंगाम आणि उतरलेल्या किंमती यामुळें शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या सामर्थ्यांत कोणतीहि सुधारणा दिसून आली नाहीं. निरनिराळीं कारणें जमून आल्यामुळें वसुलीच्या कामाच्या प्रगतींत अडचणी आल्या आणि जरी पुणें आणि अहमदनगर यांचे काळ्याचे प्रदेश धरून अनेक जिल्ह्यांत गेल्या वर्षापेक्षा वाढ दिसून आली तरी त्यामुळें सबंध प्रांतांत अशी दिसून येण्यासारखी सुधारणा झाली नाहीं. आज दोन वर्षापेक्षां अधिक काळ, मंडळ्यांच्या येणें असलेल्या रकमांचा निकाल करण्याचें काम चालूं असल्यामुळें येणें असलेल्या कर्जाच्या रूपानें मंडळ्यांच्या वास्तविक जायदादी किती आहेत त्यासंबंधीं मंडळ्यांची स्थिति स्पष्ट कळण्यास कांहीं अंशीं मदत झाली आहे. ( कर्जाऊ दिलेल्या ) नवीन भांडवलाची रकम ६१ लाख झाली व ती, लगत मागील सालच्या आंकड्यांपेक्षा ७ लाखांनीं कमी आहे व यावरून ( कर्जाऊ द्यावयाच्या ) नवीन रकमा देतांना सावधगिरीचें धोरण स्वीकारल्याचें दिसून येतें. एकूण कामचलाऊ भांडवलांत जरी कमतरता आली असली–व यास कारण मुख्यत्वेंकरून बँकांचीं देणें असलेलीं कर्जें, सभासदांच्या ठेवी व इतर बाहेरच्या देणें असलेल्या रकमा यांतील घट हें आहे–तरी रिझर्व फंड, इतर फंड व नफे यांत समाधानकारक वाढ झाली आहे. केवळ पत–पेढ्यांच्या बदला व्हिलेज क्रेडिट अँड थ्रिफ्ट सोसायट्या आणि मल्टिपरपज् ( विविधहेतूसाठींच्या ) सोसायट्या यांची नोंदणी करण्याच्या धोरणामुळें सदरहू वर्षांत ४४ नवीन व्हिलेज क्रेडिट अँड थ्रिफ्ट सोसायट्या व ७ मल्टिपरपज् सोसायट्या अस्तित्वांत आल्या. सदरहू वर्षांत ६७ मंडळ्या रद्द होऊन १०० मंडळ्या नोंदण्यांत आल्या व अशारीतीनें प्रांतांतील मंडळ्यांची एकूण संख्या ५,०९३ इतकी होती तींत वाढ होऊन ती ५,१२६ इतकी झाली.

पश्चिम–खानदेश आणि पंचमहाल जिल्ह्यांच्या मागसलेल्या प्रदेशांत चालविलेल्या भिल्ल लोकांच्या मंडळ्या भिल्ल लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कामीं उपयुक्त ठरल्या आणि भिल्ल लोकांच्या हितासाठीं खरेदी आणि विक्री करणाऱ्या ( पर्चेस अँड सेल ) मंडळ्यांची रचना करण्यासाठीं अंशतः वगळलेल्या [ पार्शली एक्स्क्ल्यूडेड ] प्रदेशाकरितां, नेमलेल्या स्पेशल एन्कायरी ऑफिसरानें सादर केलेल्या रिपोर्टांवरील सरकारी हुकुमांस अनुसरून आणखी उपाय योजण्यांत येत आहेत.

देखरेख ठेवण्याच्या सुधारलेल्या योजनेप्रमाणें जिल्हा बोर्डांची संख्या १६ राहिली व त्यांना ९५ युनियनस् जोडण्यांत आलेल्या होत्या. शेतकीच्या चळवळीचें कमीत कमी खर्च करून जास्तीत जास्त हित साधण्याच्या दृष्टीनें देखरेख ठेवण्याच्या कामाची पुनर्रचना करण्याच्या प्रश्नावर विचार चालू आहे.

### नॉन्‌क्रेडिट सोसायट्यांची प्रगति

ॲग्रिकल्चरल नॉन्–क्रेडिट सोसायट्यांची प्रगति समाधानकारक रीतीनें चालू होती. विशेषेंकरून कापूस पिकविणाऱ्यांना अधिक चांगल्या किंमती मिळविण्याचे कामीं कारणीभूत झालेल्या कापसाच्या विक्रीबाबतच्या मंडळ्यांचा [ कॉटन सेल सोसायट्यांचा ] विशेष उल्लेख करणें योग्य आहे. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स् नोंदण्याबाबतच्या भावी धोरणासंबंधींच्या सरकारच्या हुकुमाप्रमाणें ज्यांचें काम कार्यक्षम रीतीनें चालूं नसेल अशा तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनच्या कामाची, त्यांची घटना व चालकवर्ग यांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें त्यांच्या कारभाराची तपासणी करण्याबाबत व ज्या प्रदेशांत तालुका डेव्हलपमेंट असोसिएन्सबाबत मागणी असेल त्या प्रदेशांत बेटर फार्मिंग सोसायट्यांची [ अधिक चांगल्या रीतीनें शेती करण्याबाबत मंडळ्यांची ] रचना करण्याबाबत असिस्टंट रजिस्ट्रार व रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर यांस हुकूम देण्यांत आले.

### सहकारी बँकांची परिस्थिति

मुंबई प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेची व्यवस्था उत्तम प्रकारें चालू राहून सदरहू बँकेच्या उत्पन्नाचीं साधनें सदरहू वर्षांत १० लाखांनीं वाढलीं. कांहीं जिल्ह्यांतील शेतकीच्या प्रतिकूल हंगामामुळें थकबाक्यांच्या शेंकडा प्रमाणांत जरी वाढ झालेली असली तथापि डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँकांची आर्थिक परिस्थिति उत्तम असण्याचें चालूं राहिलें. कर्ज निवारण्याबाबतच्या कायद्याच्या सुरुवातीमुळें कर्जाऊ रकमा पुरवणाऱ्या मध्यवर्ती सहकारी संस्थांवर अधिक मोठी जबाबदारी पडली आणि कर्जाऊ रकमा देणें व बाजारांत माल विकणें [ मार्केटिंग ] अशा दोन्हीं क्षेत्रांत त्यांनीं जी कामगिरी करण्याची अपेक्षा आहे ती कामगिरी दर्शविणाऱ्या तपशिलवार सूचना त्यांस देण्यांत आल्या. शेतकी चळवळीची पुनर्रचना करण्याचे कामीं प्रांतिक आणि मध्यवर्ती बँकांनीं एकंदरींत बरेंच कार्य केलें.

### लँड मार्टगेज बँका

लांब मुदतीनें कर्जाऊ रकमा देण्याच्या क्षेत्रांत मुंबई प्रांतिक को–ऑपरेटिव्ह लँड मार्टगेज बँकेनें आपलें कार्य नेटानें पुढें चालविलें. बँकेनें काढलेल्या २० लाख रुपयांचें डिबेंचर्स पूर्णपणें विकले गेले. सदरहू वर्षांत मंजूर केलेल्या कर्जाची एकूण रकम रुपये ९,३४,५०० इतकी होती तर तीच लगत पूर्वीच्या वर्षी रु. ७,३२,९२० इतकी होती. प्रायमरी लँड मार्टगेज बँकांची संख्या १३ होती ती वाढून १४ झाली आणि ज्यांच्या बाक्या अत्यंत थकल्या आहेत अशा तीन जुन्या बँका अपवाद म्हणून सोडून दिल्या तर बाकी राहिलेल्या बँकांनीं समाधानकारक प्रगति कायम ठेविली होती.

### अर्बन बँका

चळवळीच्या बिन–शेतकीबाबतच्या क्षेत्रांत मंडळ्यांची ( सोसायट्यांची ) संख्या, मालकीचें भांडवल व कामचलाऊ भांडवल यांच्यांत सदरहू वर्षांत समाधानकारक वाढ झाली. वेळेवर व पुरेशा कर्जाऊ रकमांची सोय करून व पैसे रवाना करण्याबाबत सवलती देऊन व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ करण्याचे कामीं विशेषेंकरून अर्बन बँका उपयोगी पडल्या व जेथें जॉइंट स्टॉक बँकांचा संबंध येत नाहीं अशा तालुक्यांची लहान गांवें धरून शहराच्या प्रदेशांत बँकांच्या व्यवहाराची त्यांनीं लोकांत आवड उत्पन्न केली. बॉंबे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीनें समाधानकारक प्रगति चालू ठेविली. कन्झ्युमर्स सोसायट्यांच्या सभासदांच्या संख्येंत, कामचलाऊ भांडवलांत, विक्र्यांत, खरेद्यांत व तशीच नफ्यांतहि सर्व बाजूंनीं वाढ झाली आहे. घरें बांधण्याबाबतच्या चळवळींत मंडळ्यांची (सोसायट्यांची) संख्या ५ नीं वाढली आणि येणें असलेल्या सरकारी कर्जाची बाकी पूर्वी २४ लाख होती ती घटून २२ लाख झाली, लायक अशा तीन सोसायट्यांचे बाबतींत सरकारनें मदत म्हणून व्याज कमी करण्यास मंजुरी दिली.

### इन्स्टिट्यूट

प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचीं कार्यें व घटना यासंबंधीं कोणताच निर्णय इन्स्टिट्यूटला करतां आला नाहीं. डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट बोर्डस् निघाल्यापासून इन्स्टिट्यूटच्या जिल्ह्यांच्या शाखांना कार्य करण्यास फारच थोडा वाव राहिला; आणि म्हणून त्या सरकारी हुकुमान्वयें बंद करण्यांत आल्या. सहकारी तत्त्वासंबंधीं ट्रेनिंग व शिक्षण देण्याची योजना सबंध वर्षभर चालू होती व सदरहू वर्षांत सरकारनें मंजूर केलेल्या खेड्यापाड्यांच्या प्रदेश-सुधारणेबाबत ( रूरल डेव्हलमेंट ) योजनेअन्वयें पुनर्रचना केलेल्या को-ऑपरेटिव्ह अँड रूरल डेव्हलपमेंट डिपार्टमेंटकडे बदली केलेल्या शेतकी खात्याच्या प्रचारकार्य करणाऱ्या नोकरवर्गापैकी कांहीं इसमांना सुद्धां ट्रेनिंग देण्यांत आलें.

रिपोर्टाच्या वर्षी खात्यांतील अधिकारी व सहकारी संस्था या दोहोंवरहि कामाचा अतिशय ताण पडला. रजिस्ट्रार व मि. व्ही. एल. मेहता यांनीं सरकारला सादर केलेल्या जॉईंट रिपोर्टावर काढलेल्या सरकारी हुकुमांची अंमलबजावणी करण्यांत येत होती. खेड्यापाड्यांच्या प्रदेशाची सुधारणा करण्याची विस्तृत योजना अंमलांत आणिल्यामुळें बिनसरकारी कार्यकर्त्यांना नवीन उत्साह प्राप्त झाला व खेड्यापाड्यांचा प्रदेश सुधारण्याच्या कामीं मदतीदाखल कार्य करण्यासाठी पुष्कळांनीं स्वखुषीनें आपलीं नांवें नोंदलीं.


### सातारा जिल्हा को. लँ. मॉ. बँक लि., कराड

वरील बँकेचें भाग भांडवल ३४,१४० रुपयांचें असून मुंबई प्रां. को. लँ. मॉ. बँक लि. कडून घेतलेलें कर्ज ९,१७,१२२ रुपयांचें आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड २,१०५ रुपयांचा असून डिबेंचर्समध्यें १,९७० रुपये व शेअर्समध्यें १२,२०० रुपये गुंतविले आहेत. अहवालाचे वर्षी ४३ सभासदांना ५५,५०० रुपयांचें कर्ज अदा केलें आहे. वरिष्ठ बँकेनें कर्जफेड करण्याची अखेरची मर्यादा २० वर्षांवरून १५ वर्षांवर आणून ठेवली, व्याजाचा दर ६ टक्क्यांवरून ६॥ टक्केपर्यंत वाढविला; तसेंच युद्धपरिस्थितीमुळें सरकारनें डिबेंचर्स विक्रीस लवकर परवानगी न दिल्यामुळें वरिष्ठ बँकेकडे फंड वेळेवर मिळूं शकले नाहींत त्याचा परिणाम प्राथमिक बँकांच्या कामकाजावरहि झाला आहे. असें असूनहि अहवालाचे वर्षी बँकेस २,००६ रुपयांचा निव्वळ नफा झाला. अहवालाच्या वर्षाअखेर २१६ सभासदांना २,६३,१२५ रुपयांचें कर्ज देण्यांत आलें असून त्या कर्जाबाबत एकूण २,७२४ एकर २३/४ गुंठे, आकार रु. ७९१३-९-१०३/४ ची जमीन वरील कर्जात कबजे-गहाण घेतली असून सदर जमिनीची वरिष्ठ बँकेचे दृष्टीनें किंमत ६,०५,९४० रुपयांची होते. थकबाकी वसूल करण्यांत लवादाऐवजी मद्त दावे करण्याचा प्रयत्न केलेल्या दृष्टीनें सोइस्कर ठरतो, असा या बँकेचा अनुभव आहे. थकबाकीचें येणें हप्त्याशीं प्रमाण १७.७५% पडतें. अहवालाचें वर्षी बँकेनें बॉं. प्रां. को. लँ. मॉ. बँकेकडून ५८,४०० रुपयांचें कर्ज घेतलें होतें. त्याच्या परतफेडीचा व्याज–मुद्दलासह १९,०५९ रुपयांचा हप्ता बँकेनें मुदतींत भरला झाबद्दल वरिष्ठ बँकेनें समाधान व्यक्त केलें आहे. बँकेची वार्षिक सभा २९–९–४० रोजीं झाली.


## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रु ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. ११ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा पट्ट्यांचें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

## दर्यावरील मच्छीमारी

### मुंबई प्रांतांतील मच्छीमारीचा धंदा

मासळीच्या धंद्यामध्यें सरकारी उद्योगखात्याच्या लाँचचा उपयोग लोकप्रिय करण्याच्या प्रयोगाला आलेलें यश अत्यंत समाधानकारक होतें. यासंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं मासळीच्या धंद्यासाठी लागणाऱ्या मोटर लाँचमध्यें भांडवल गुंतवण्याची प्रवृत्ति भांडवलवाल्या वर्गामध्यें वाढत आहे. या वर्षी खाजगी व्यक्तींच्या मालकीचीं दोन नवीन गलबतें या धंद्याकडे लावण्यांत आलीं, लाँचवर अधिक मोठीं इंजिनें ठेवण्याची व पूर्वी बांधलेल्या गलबतांपेक्षां मोठीं गलबतें बांधण्याची प्रवृत्तिहि वाढत आहे. या प्रांताच्या दर्याकिनाऱ्यास चालणाऱ्या अशा एकंदर ७ लाँच आहेत. जेथें लाँच वापरण्यांत येत होत्या अशा दर्याकिनाऱ्याच्या बंदरांवरील मच्छीमार लोकांना आपल्या मासळीची अधिक चांगली किंमत आली आणि त्यांनीं आपल्या धंद्यांत अधिक लक्ष घातलें. लाँचनीं मुंबईत आणलेल्या मासळीच्या अधिक पुरवठ्यामुळें इतरांनाहि, म्हणजे, पोर्ट–ट्रस्ट, म्युनिसिपालिटी, सरपण पुरविणारे, मुंबईतील कोळी व कोळणी, वाहतुकीचा धंदा आणि लाँचचे खलाशी ह्यांनाहि फायदा झाला.

खात्याच्या व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या लाँचनीं आणलेली एकूण मासळी १५,०५,५८९ पौंड होती. तसेंच मालवण येथें गोठविलेली सुमारें १,०८,००० पौंड मासळीही आगबोटीनें मुंबईला आणण्यांत आली होती. लाँचेस, मुंबई व दक्षिणेस रत्नागिरी व कानडाचा किनारा यांच्यापासून दूरवरच्या आणि उत्तरेस मुद्‌वार, जाफराबाद, दीव, इत्यादि यांच्यापासून दूरवरच्या मच्छीमारीच्या जागा यांमध्यें चालल्या. तथापि हर्णई, मुरूड, श्रीवर्धन, इत्यादींच्या आसपासचा प्रदेश गेल्या वर्षी प्रथमच उपयोगांत आणण्यांत आला. होतकरू कोळ्यांना लाँचचीं इंजिनें चालविण्यास शिकविण्याची योजना चांगली प्रगति करीत आहे. हल्लीं खात्याच्या सर्व लाँचेसवर केवळ कोळी जातीच्या तरुणांचाच भरणा आहे.

चालू सालीं दोन बर्फाचे कारखाने व थंड स्थितींत सांठविण्याची कोल्डस्टोरेजची एक योजना ह्या गोष्टी मुंबईमध्यें सुरू करण्यांत आल्या. ह्यांपैकीं एक, लाँचेस व मासे पकडणाऱ्या होड्या ह्यांनीं आणलेलीं मासळी जेथें उतरण्यांत येते त्या ससून डॉकमध्यें आहे. ही फारच मोठी सोय आहे कारण ह्यामुळें ज्यां वेळीं किरकोळ विक्री करणारे जागेवर नसतात अशा दिवसाच्या अगर रात्रींच्या कोणत्याहि आड वेळीं कोळ्यांना त्यांनीं पकडलेला माल सांठवून ठेवतां येतो.

### मासे खारवून वाळविण्याचीं आवारें

ह्या प्रांतांत मासे खारवून वाळविण्याचीं ३२ आवारें—१८ रत्नागिरी जिल्ह्यांत व १४ कानडा जिल्ह्यांत—आहेत. आवारांत खारवून वाळविलेल्या माशांमध्यें मुख्य प्रकार मॅकेरल ( बांगडे ), कॅट फिश ( शिंगाळा ), सुशी, कर्मट, घोळ, घोडी, गेदाल, खवळी, पेढवा व सुरमाई हे होते. खाऱ्या मातीनें मासळी खारवून वाळविण्याच्या पद्धतीमुळें रत्नागिरी व कानडा जिल्ह्यांतील कांहीं आवारांतून विक्री फार मोठ्या प्रमाणांत कमी झाली. मिठाच्या असमाधानकारक विक्रीचें दुसरें कारण म्हणजे जी मासळी एऱ्हवीं आवारांत गेली असती अशी मासळी फार मोठ्या प्रमाणांत मुंबईला आणणाऱ्या लाँचेस हें होय. ही अवनति टाळण्याचा एकच उपाय म्हणजे समुद्रांतून अधिक मासळी मिळेल अशा रितीनें आपल्या हल्लींच्या मासे धरण्याच्या पद्धतींत सुधारणा करणें हा होय.

तारीख ३१ माहे मार्च सन १९३९ रोजीं संपलेल्या वर्षी २१४,३८७ मण ताजी मासळी आवारांत आणण्यांत आली होती व मासळी खारवून वाळविण्यासाठीं ६२,९६४ मण मीठ देण्यांत आलें होतें. आवारांतून नेलेली खारवून वाळविलेली मासळी १,६६,५३७ मण होती. मासळी खारवून वाळविणारांना दर्यांत आपली मासळी खारवून वाळविण्यासाठीं सुमारें १,०२५ मण मीठ जकात माफ करून देण्यांत आलें. मासे खारवून वाळविण्याच्या आवारांतून ७७८ मण मीठहि शेतकऱ्यांना खताच्या कारणांसाठीं जकात माफ करून देण्यांत आलें.

### प्रांतांतर्गत मच्छीमारीचे धंदे

गोड्या पाण्यांतील मच्छीमारीच्या धंद्याची वाढ करण्यासाठी चालू सालीं आणखी प्रयत्न करण्यांत आले. गेल्या पावसाळ्यांत अवेळीं पावसामुळें सदरहु प्रयोगाच्या यशाला बऱ्याच मोठ्या प्रमाणांत अडथळा आला. आंत मासे सोडलेलीं वरीचशीं तळीं व तलाव वरून वाहू लागले; ह्याचा परिणाम असा झाला कीं बरेचसे मासे वाहून गेले.

आयात केलेल्या व स्थानिक अशा दोन्ही प्रकारच्या निरनिराळ्या जातींच्या माशांबाबत येथील तळ्यांतून ते वाढण्याची शक्यता अजमावण्यासाठी चालू सालीं प्रयोग चालू ठेवण्यांत आले. गौरमी व एट्रोप्लस ह्यांची चालू सालीं खूप वाढ झाली आणि त्यांच्या वाढीचें प्रमाणहि फार समाधानकारक आहे. जेथें वाहतें पाणी एकत्र मिळालें होतें अशा तळ्यांतून कटलाची निपज करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत.

सदरहु प्रयोग विस्तृत प्रमाणांत करण्यांत सगळ्यांत मोठी अडचण म्हणजे जे थोडक्या खर्चांत गोळा करतां येतील व ह्या प्रांतांतील तलावांतून पोसतां व वाढवितां येतील अशा योग्य लहान माशांच्या पुरवठ्याचा अभाव ही होय. ह्या अडचणींतून पार पडण्यासाठीं सदरहु प्रयोगाच्या कारणाकरितां उपयोगी पडतील असे मासे शोधून काढण्याच्या दृष्टीनें उद्योग खात्यानें नद्यांची पाहणी चालू ठेविली. ह्या पहाणीच्या कामाला अद्याप फलप्राप्ति झालेली नाहीं.

---

## ट्रेड यूनियन्सच्या विमा–व्यवहारावर नियंत्रण

१९२६ च्या विमा कायद्यान्वयें ट्रेड युनियनला कोणत्याहि प्रकारचा विम्याचा व्यवसाय करतां येतो; त्या व्यवसायाच्या सुरक्षितपणाची खात्री होण्याकरितां त्यांस विमा गणित्याचा सल्ला आवश्यक ठेवलेला नाहीं. अशा योजनांपैकीं सर्वांत परिचित म्हणजे डिव्हायडिंग तत्त्वावर चालविलेली योजना ही होय. अशा योजना १९३८ च्या विमा-कायद्यास धरून नाहींत. तथापि, ट्रेड यूनियन्सना डिव्हायडिंग तत्त्वावर व्यवहार करण्यास आज प्रतिबंध नाहीं, व त्या व्यवहारांत लबाडीस बराच वाव रहातो. असले व्यवहार नियंत्रित करण्यासाठीं ट्रेड यूनियन्सचे विमा-व्यवसाय १९३९ च्या विमा कायद्याखालीं आणावे, अशी सूचना करण्यांत आली असून तिचेवर प्रांतिक सरकारांचीं व कांहीं निवडक व्यक्तींचीं मतें मागविण्यांत आलीं आहेत. ट्रेड यूनियन्सच्या विमाव्यवहारावर तज्ज्ञांची देखरेख रहाण्यानें यूनियन्सच्या हिताचेंच संरक्षण होईल, हे उघड आहे.

## कपास कापडाच्या गिरण्या

### जिल्हावार वांटणी

इतर प्रांतांचे मानानें मुंबई प्रांत कपास कापडाच्या उत्पादनाचे बाबतींत अग्रेसर आहे. हिंदुस्थानांतील गिरण्यांमधील एकूण चात्यांपैकीं ५६%, मागांपैकीं ६५%, कामगारांपैकीं ५४%, काढलेल्या सुतापैकीं ४९% व विणलेल्या कापडापैकीं ६५% अशी मुंबई प्रांताची वांटणी आहे. मुंबई प्रांतांतहि मुंबई शहर व अहमदाबाद येथें गिरण्या एकत्रित झालेल्या आहेत. खालील तक्ता जिल्हावार तपशील दाखवतो:—

| | चात्या | माग | कामगार |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | २९,०६,२०२ | ६७,२९४ | १,१८,९९३ |
| अहमदाबाद शहर | १९,४२,२८६ | ४७,१४७ | ७४,२७९ |
| सोलापूर जिल्हा | ३,१७,३६८ | ६,८०६ | २०,३६८ |
| पूर्व खानदेश | १,००,३४० | २,४६३ | ५,८४२ |
| बेळगांव | ७४,३२८ | | २,७५९ |
| खेडा, | ५९,०२८ | १,१२८ | २,३११ |
| भडोच | ५१,८२८ | १,१७४ | २,१४४ |
| विरमगांव | ४५,५०८ | १,१८७ | २,१६० |
| धारवाड | ४९,४४४ | ८०० | २,७५३ |
| प. खानदेश | ४६,१३६ | १,०५८ | २,५७२ |
| पुणें | १५,५९२ | ५५२ | ८१४ |
| ठाणें | | २७१ | ३२३ |
| इतर | १८,९६४ | ७०२ | १,२७७ |
| | ५६,३१,०२४ | १,३०,५८२ | २,३६,५९५ |

### मुंबई प्रांतांतील होजिअरीचे कारखाने

कांहीं वर्षांपूर्वी होजिअरीचा पुरवठा बहुंशीं जपानमधून होत असे. आतां होजिअरीचे कारखाने येथें निघाले आहेत. १९३८ सालीं मुंबई प्रांतांत १४ कारखाने होते व त्यांतील कामगारांची संख्या १,७८० होती. फॅक्टरी ॲक्टाखालीं न येणारेहि कांहीं लहान कारखाने होजिअरी तयार करीत होते. पुणें शहरांतील सदर्न निटिंग वर्क्समध्येंच आतां सुमारें ३५० कामगार आहेत, हें येथें सांगणें आवश्यक आहे. या १४ कारखान्यांची वाटणी येथें दिली आहे:—

| जिल्हा | कारखान्यांची संख्या | त्यांतील कामगार |
|---|---|---|
| मुंबई शहर | ३ | ९१ |
| अहमदाबाद | ८ | १४९७ |
| मुंबई उपनगर | १ | ७२ |
| पुणें | २ | १४९ |

मुंबई प्रांतांत १९३७–३८ मध्यें १८ लक्ष रुपयांची होजिअरी आली, यावरून या मालाच्या खपास वाव किती आहे, हें दिसून येतें. १५ कामगारांच्या कारखान्यांत सुमारें २० हजारांच्या भांडवलावर दरमहा सरासरीनें सुमारें १,५०० रुपयांचा माल निघूं शकतो, असें ठाकूरदास कमिटीच्या रिपोर्टांत म्हटलेलें आहे.

भारत
दररोज
६,००० रुपयांपेक्षा अधिक
क्लेम्सचे पैसे विमेदारांस
परत केले जातात.
भारत
इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
मुख्य कचेरी:
भारत बिल्डिंग्ज, लाहोर
१८९६ मध्यें स्थापन झालेली
ब्रँच ऑफिस : लक्ष्मीरोड, पुणें.

दि गुड–वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारांस
भरपूर सवलती माफक दर
ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.
मॅनेजिंग डायरेक्टर

### पुणें जिल्ह्यांतील युद्धसहाय

खडकी जिमखाना क्लबनें खडकी शर्यतींमधील नफ्याचे ६,६०० रुपये आर. ए. एफ. साठीं दिले. टर्फ क्लबच्या वॉर प्लेन बॉलचें उत्पन्न (५,७८५ रु. ५ आ.) १,००० रुपये आय. ए. एफ.ला व उरलेले आर. ए. एफ. साठीं वाटून दिले. ऊंगडे यें ३,००० रुपयाचें उत्पन्न वॉर गिफ्ट फंडास देण्यांत आलें. स्त्रियांच्या कमिटीनेंहि महाजॉंग ड्राइव्हचें उत्पन्न (२७१ रु. १२ आ.) व शाळांतून जमा केलेलें (२१० रु. ८ आ.) युद्धकार्यास मिळवून दिलें. विन्सेंटस स्कूलमध्यें कॉन्सर्टचे वेळीं ८०२ रुपये मिळाले, ते व गोव्याच्या कांहीं लोकांनीं दिलेले ४४० रुपये युद्धकार्याकडे जमा झाले. वॉर गिफ्ट फंडास मिळालेल्या पूर्वीच्या २१,७०४ रुपयांत देणग्यांची भर पडून एकूण फंड ४८,२७२ रुपये झाला.

---

### निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

#### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९१—२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—१ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९०—३ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९५—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०३—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१–६१) — .. | १०९—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... — | १२०—० |

#### मंडळ्यांचे भाव

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | ११३—१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३६—८ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १४९०—० |
| बांबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०१—१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% ... ... | १२८—८ |
| कराची (१००) ९% ... ... ... | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २११—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १४०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५८०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १००६—४ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ७७०—० |


स्पृहणीय यश

**बोनसचे दरांत २० टक्के वाढ**

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल-

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स**

कंपनी लि० पुणें

लिह्म अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

---

**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

**दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस**

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर, पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.




एजंट:—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेसक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वत:ची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बंबाचे माडीवर
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
नीळकंठ वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविलास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.